जालना सीड पार्क प्रकल्पाकरिता पायाभूत सुविधांची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उभारणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण-१२१७/प्र. क्र.४८/१४-अे ,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.

दिनांक : १० जानेवारी, २०१८

संदर्भ:

१. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र. ०९१६/प्र. क्र.११२/राकृवियो कक्ष, दि.१३.१०.२०१६
२. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र. संकीर्ण-१२१७/प्र. क्र.४८/१४-अे, दि.०५.१२.२०१७
३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. आयडीसी-२०१७/प्र.क्र. ७८३/उ.१४, दि.२८ डिसेंबर, २०१७

प्रस्तावना :-

जालना परिसरातील पायाभूत सुविधा विकसित करून बियाणे उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी पोषक वातावरण निर्मितीसाठी जालना परिसरात सीड पार्क उभारण्यास संदर्भाधिन दि. १३ ऑक्टोंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. या संदर्भात मा. मंत्रीमंडळाने दि.०७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत सदर प्रकल्पास चालना देण्याच्या दृष्टीने संदर्भाधिन दि.०५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जालना परिसरात १३० एकर जमिन विकसित करुन बियाणे उद्योगांच्या उभारणीकरिता उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

दि.२० डिसेंबर, २०१७ अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी, जालना यांनी सद्यस्थितीत मौजे पानशेंद्रा जि. जालना येथील ७५ एकर (३०.६९ हेक्टर) शासकीय जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडास उपलब्ध करुन देणे शक्य असल्याचे नमूद केले होते. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रकल्पाकरिता प्रथम टप्यात ३० हेक्टर जागा पुरेशी असल्याचे नमूद करण्यात आले. सबब, दि.०५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शासन निर्णय :-

१. जालना येथे सीड हब / पार्क उभारणी करण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मौजे पानशेंद्रा जि. जालना येथे उपलब्ध असलेली ७५ एकर (३०.६९ हेक्टर) जमिन विकसित करुन बियाणे उद्योगांच्या उभारणीकरिता उपलब्ध करुन दयावी. सदर सीड पार्कमध्ये विकसित जमिनीचे भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या प्रचलित धोरणानुसार विविध बियाणे उद्योगांना विक्री करावेत.

२. जालना सीड पार्क प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने दि.१३ ऑक्टोंबर, २०१६ व दि.०५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील दिशानिर्देशानुसार कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१११२१७३५३००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.01.11 12:20:42 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई
११.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ, गोरेगाव (पू.), मुंबई
१२.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
१३.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे,
१४.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
१५.जिल्हाधिकारी, जालना
१६.संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, पुणे
१७.कुलगुरू (सर्व कृषि विद्यापीठ)
१८. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
१९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
२१.वित्त विभाग (व्यय १ / बियुडी १३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२२.नियोजन विभाग (कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२३.कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - २अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२४.कार्यासन १४-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.